# भारताचा कायदेशीर आराखडा: व्यवसाय सुलभता

## एमएसएमई सक्षमीकरण आणि गुंतवणूक मित्र सुधारणा यांचा नवा युग



**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**नागपूर, दि. २६**

भारत आज कायदेशीर आणि नियामक क्षेत्रात मोठ्या परिवर्तनातून जात आहे. व्यवसाय सुलभता, एमएसई पुनरुज्जीवन, वादांचे जलद निराकरण आणि (विलिनीकरण-अधिग्रहण) साठी सक्षम वातावरण तयार करणे हे सुधारणा कार्यक्रमाच्या केंद्रस्थानी आहे.

भारताचा कायदेशीर परिदृश्य: व्यवसाय सुलभता, एमएसई पुनरुज्जीवन आणि जबाबदार भांडवलाला चालना'' या परिषदेसंदर्भात आयोजित पत्रकार परिषदेत एयू कॉर्पोरेट ॲडव्हायझरी आणि लीगल सर्व्हिसेसचे संस्थापक अक्षत खेतान यांनी उद्योजकता व गुंतवणूक वाढीस कायदे कसे हातभार लावत आहेत यावर भाष्य केले.खेतान म्हणाले, ''आज कायदा अडथळा नाही, तर व्यवसायाचा भागीदार आहे.आम्ही पारदर्शक, पूर्वनिश्चित आणि उद्योजक-मित्र कायदेशीर वातावरण निर्माण करण्यास वचनबद्ध आहोत.''कॉर्पोरेट गव्हर्नन्स, डिजिटल फाइलिंग, सुलभ पालन प्रक्रिया व जागतिक गुंतवणुकीस प्रोत्साहन देणाऱ्या तरतुदींमुळे भारत व्यवसायासाठी अधिक स्पर्धात्मक ठरत आहे.दंडात्मकता कमी, डिजिटल न्याय अधिक-लहान व तांत्रिक चुका असताना तुरुंगाऐवजी दंडाची तरतूद, ई-कोर्ट्स फेज-III द्वारे पूर्ण डिजिटल न्याय प्रणाली, ऑनलाइन सुनावणी, ई-फाइलिंग या सुधारांमुळे वाद निराकरण वेगवान झाले असून आणि गुंतवणूकदारांना मोठा फायदा होत आहे.